**नियमीत दिवाणी मुकदमा नं. ७१/२०१६ मधील निशाणी ७६ वरील आदेश**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज सहाय्यक अधिक्षक, अभिलेख कक्ष, जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग–ओरोस यांना समन्स काढून रे.दि.मु.नं. ६७/१९९६ मधील निशाण ९१ वरील जयराम नानु जोशी यांनी दिलेल्या मुळ जबाबाची प्रत हजर करणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादीचे कथन असे की, प्रतिवादीचे मयत बंधु सुभाष धोंडु जोशी यांनी निशाणी ९१ येथे प्रतिवादीचे वडिल जयराम नानु जोशी यांनी दिलेल्या जबाबाची मुळ प्रत याकामी हजर केलेली आहे. सदरचा जबाब हा आत्ताचे प्रतिवादी शिवराम जयराम जोशी यांचे हस्ताक्षरात आहे. सदरची बाब वादीने आपल्या दाव्यामध्ये नमूद केली आहे. सबब, सदरील दस्त पुराव्याचे कामी शाबीत होणे आवश्यक आहे. तसेच वादी आवश्यक तो भत्ता देण्यास तयार आहे. सबब, त्यांचे मागणीप्रमाणे सहाय्यक अधिक्षक, अभिलेख कक्ष, जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग–ओरोस यांना समन्स काढून रे.दि.मु.नं. ६७/१९९६ मधील निशाण ९१ वरील जयराम नानु जोशी यांनी दिलेल्या मुळ जबाबाची प्रत हजर करणेसाठी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावरच म्हणणे देऊन अर्जास विरोध दर्शविला आहे.

०४. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. उभय पक्षकारांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा हा कायम ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. वादी यास त्यांचा दावा शाबीत करणेकरीता सदरील दस्तऐवज पुराव्याचे कामी शाबीत करणे आवश्यक असल्याने प्रस्तुतचा दस्तऐवज हा अभिलेखावर येणे

गरजेचे आहे. तसेच वादी आवश्यक तो भत्ता देण्यास तयार आहे. वादीचे अर्जातील कथने तसेच युक्तीवाद ऐकला असता त्यांनी सदरील जबाबाची मुळ प्रतीवरील जबाबातील कथने व त्यावरील अंगठयाची निशाणी हे शाबीत करायचे असल्याने सदरील दस्ताची मुळ प्रत याकामी आवश्यक असल्याचे दिसून येते. सबब अर्ज मंजुर करण्यास पात्र आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. रे.दि.मु.नं. ६७/१९९६ मधील निशाण ९१ वरील जयराम नानु जोशी यांनी दिलेल्या मुळ जबाबाची प्रत याकामी हजर करणेकामी सहाय्यक अधिक्षक, अभिलेख कक्ष, जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग–ओरोस यांना पत्र पाठविणेत यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.04.23 16:09:15 +0530

दिनांक – १५/०४/२०२४ (पी.आर.ढोरे)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर

कुडाळ